# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**थळ (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील आरसीएफ कंपनीमध्ये झालेल्या वायुगळतीबाबत**

**(१) ४०७६२ (२८-०४-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) थळ (ता.अलिबाग, जि.रायगड) येथे असलेल्या राष्ट्रीय फर्टिलायझर्स (आरसीएफ) प्रकल्पात शनिवार, दिनांक २ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास वायुगळतीमध्ये एक कर्मचारी अत्यवस्थ झाला तर ग्रामस्थांना श्वसनाचा त्रास झाल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच भविष्यात सदर कंपनीत वायुगळती होवू नये म्हणून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०६-०४-२०१७) :** (१) वायू गळती झाली हे खरे नाही. तथापि, कारखान्याचा युरिया प्लान्ट क्र. ११ बंद करतेवेळी कामगारास डोळे चुरचुरणे व श्वसनाचा त्रास झाला हे खरे आहे. मात्र परिसरातील ग्रामस्थांना याची बाधा झालेली नाही.
(२) होय.
(३) सदर वायुगळती हा अपघात असून सदर अपघाताची चौकशी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, रायगड यांच्यामार्फत करण्यात आलेली आहे.

चौकशीत असे आढळून आले आहे सदर कारखान्यातील युरिया प्लान्ट बंद करताना, प्लान्ट धुण्यासाठी वापरलेले पाणी, जमिनीखाली असलेल्या टाकीमध्ये गोळा केले जाते व प्लान्टमध्ये राहिलेल्या अमोनिया वायूचा अंश सदर टाकीच्या व्हेन्ट पाईपमधून बाहेर पडतो. दिनांक २.१.२०१६ रोजी असे काम चालू असताना टाकीमध्ये जमा झालेल्या पाण्याबरोबर आलेला अमोनिया वायू टाकीच्या व्हेन्ट पाईपमधून निघून त्याचा ढग तयार झाला. हवेच्या झोताने हा वायू या टाकीच्या जवळ असलेल्या १० मी. उंचीवरच्या प्लॅटमाफॉर्मपर्यन्त पोहचला. त्यामुळे तेथे काम करीत असलेल्या एका कामगाराला डोळे चुरचुरणे, गुदमरणे, उलटी होण्याचा त्रास झाला, त्यास कारखान्याच्या दवाखान्यात उपचार करुन त्याच दिवशी घरी सोडण्यात आले व एका दिवसानंतर तो कामावर रुजू झाला.

सदर घटनेत व्यवस्थापनाने टाकीतून निघणारा अमोनिया वायू निष्क्रीय करण्याची यंत्रणा (Scrubur) व पाण्याचे फवारे लावलेले नव्हते. तसेच १० मीटर उंचीवर असलेल्या प्लान्टमध्ये स्वंय श्वसन यंत्र (Self Breathing Apparatus) ठेवलेले नव्हते. म्हणून कारखाने अधिनियम, १९४८ चे कलम ७(अ)(२)(अ) च्या भंगाबाबत भोगवटादाराविरुध्द मा.न्यायदंडाधिकारी यांचे न्यायलयात खटला क्र. १५८/२०१६ दि. १८.३.२०१६ रोजी दाखल केलेला आहे.

तथापि, वायूगळतीच्या घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी उद्योगास दिनांक ०८.०९.२०१६ रोजी समजपत्र देण्यात आले आहे.

(४) सदर कंपनीत भविष्यात वायूगळती होऊ नये म्हणून पुढील उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

१. अमोनियाच्या वाफा विरघळण्यासाठी सदर टाकीवर कायमस्वरुपी पाण्याची यंत्रणा बसविण्यात आली आहे.

२. सदर टाकीवरच्या व्हेंटपाईपला स्वतंत्र स्क्रबिंग व्यवस्था बसविण्यात आली आहे.

३. व्हॅक्यूम प्लान्टमध्ये स्वयं श्वसन उपकरणे ठेवली आहेत व सदर उपकरणे वापरण्याच्या सूचना कामगारांना दिल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

---

**सोलापूर येथील बाबा आईस फॅक्टरीमध्ये अमोनिया वायूची गळती झाल्याने नागरीकांना झालेला त्रास**

**(२) ४३८३९ (२८-०४-२०१६). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर होटगी रस्त्यावरील नागदेव टेक्स्टाईलच्या आवारात असलेल्या बाबा आईस फॅक्टरीमध्ये दिनांक २६ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास अमोनिया वायूची गळती झाल्याने अनेक नागरीकांना उग्रवास व डोळे चुरचुरणे इत्यादी बाधा झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०६-०४-२०१७) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) होय. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी दिनांक २७.१२.२०१५ रोजी मे. बाबा आईस फॅक्टरी, प्लॉट नं.२५, इंडस्ट्रीयल इस्टेट, होटगी रोड, सोलापूर या बर्फ तयार करणाऱ्या कारखान्यास भेट दिली. भेटीदरम्यान सदर उद्योगाने माहे एप्रिल २०११ मध्ये संमतीपत्र प्राप्त केले असून संमतीपत्राची वैधता संपल्याचे निदर्शनास आले आहे. भेटीदरम्यान संमतीपत्रातील अटी व शर्तीतील त्रुटींच्या अनुषंगाने व संमतीपत्र वैधतेबाबत मंडळाचे दिनांक २८.१२.२०१५ अन्वये सदर कारखान्यास सूचना देण्यात आली. तसेच दिनांक २०.०२.२०१६ रोजी उद्योगास प्रस्तावित निर्देश पारित केले.
(३) प्रश्न उद्‌भ‌ावत नाही.

---

### मुंबई उपनगरातील भांडूप (प.) येथील नवदिप कन्ट्रक्शन कंपनीमुळे होणारे प्रदूषण

**(३) ५४०८१ (१०-०८-२०१६). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भांडूप (प.) सीटीएस नं.२१४ भांडूप-सोनापूर, एलबीएस रोड येथील आरएमसी बनविणाऱ्या नवदिप कन्ट्रक्शन कंपनीमुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, सदर कंपनीने पर्यावरण विभागाच्या नियमाचे वेगवेगळ्या स्वरुपात उल्लंघन केल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३१ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास सदर कंपनीचे काम बंद करण्यात यावे असे निवेदन मा.पर्यावरण मंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने अद्याप कंपनी बंद झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०६-०४-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) तथापि, विचाराधीन कंपनीला दिनांक १०.३.२०१६ रोजीच उत्पादनबंदीचे आदेश देण्यात आले होते. त्यानंतर प्रदूषण मंडळाने घातलेल्या पर्यावरणपूरक अटींची पूर्तता केल्यावर दिनांक २८.४.२०१६ पासून उत्पादन सुरु करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भ‌ावत नाही.

---

**राज्यातील मुंबई, नवी मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, सोलापूर, कोल्हापूर, चंद्रपूर, औरंगाबाद, अमरावती या शहरांचा प्रदुषण नियंत्रण आराखडा तयार करण्याचा निर्णय**

**(४) ५५६६५ (१०-०८-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई, नवी मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, सोलापूर, कोल्हापूर, चंद्रपूर, औरंगाबाद, अमरावती या शहरांचा तीन महिन्यांमध्ये आयआयटी मार्फत प्रदुषण नियंत्रण आराखडा तयार करण्याचा निर्णय माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार प्रदूषण नियंत्रण कृती आराखडा तयार करण्यात आला आहे काय, असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे, यासाठी अजून किती कालावधी लागणे अपेक्षित आहे,

(३) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०६-०४-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सध्या प्रदूषण नियंत्रण आराखडा तयार करण्याचे काम प्रगती पथावर आहे. ज्यात ३ महिन्याच्या अल्पमुदतीच्या उपयायोजना व १२ महिन्याच्या दीर्घमुदतीच्या उपययोजना आहेत. आदेश प्राप्तीपासून १२ महिन्यांच्या कालावधीत हा आराखडा तयार होणे अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्‌भ‍ावत नाही.

---

**राज्यात ऐतिहासिक आणि अमूल्य ठेवा असलेल्या मोडी लिपीतील एक लाख कागदपत्रे दरवर्षी नष्ट होत असल्याबाबत**

**(५) ५५६९७ (२२-०८-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ऐतिहासिक आणि अमूल्य ठेवा असलेल्या मोडी लिपीतील एक लाख कागदपत्रे दरवर्षी नष्ट होत असल्याचा इतिहासकार व अभ्यासकांनी अंदाज व्यक्त केल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील नगरपालिका आणि महानगरपालिका शाळांमधून शिक्षकांना मोडी लिपी शिकणे सक्तीचे आणि विद्यार्थ्यांना ऐच्छिक केले जावे, मोडी लिपी आणि भाषेचे महत्व वाढविण्यासाठी एखादा दिवस मोडी दिन म्हणून शासनातर्फे साजरा करावा अशी मागणी इतिहासकार व अभ्यांसकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ऐतिहासिक वारसा असलेल्या मोडी लिपीतील कागदपत्रांचे संवर्धन व सुरक्षीत राहण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०४-२०१७) :** (१) व (२) नाही. मात्र विदयार्थी उत्कर्ष मंडळ, मुंबई यांनी दि.१४.०३.२०१६ च्या निवेदनान्वये राज्यातील सर्व शाळांमध्ये शालेय अभ्यासक्रमात मोडी लिपीचा समावेश करण्याबाबत विनंती केली आहे.
(३) पुराभिलेख संचालनालयात असलेल्या महत्वांच्या कागदपत्रांचे, यामध्ये मोडी लिपीतील कागदपत्रांचाही समावेश असून त्यांचे जतन व संवर्धन करण्याच्या दृष्टीने त्याचे प्रतिचित्रण व सुक्ष्मचित्रिकरण करण्याचे काम सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भ‌ावत नाही.

---

**चिकलठाणा (जि.औरंगाबाद) येथील औद्योगिक वसाहतीतील कन्सेप्ट फार्मा या कंपनीतील सांडपाणी व रासायनिक पाण्याची विल्हेवाट करण्याची व्यवस्था नसल्याबाबत**

**(६) ५६८६३ (१०-०८-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहरातील चिकलठाणा औद्योगिक वसाहतीतील कन्सेप्ट फार्मा या कंपनीच्या कर्मचा-यांकडून मुदतबाहय औषधे कंपनीच्या आवारात पुरतांना दिनांक १३ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या विभागीय अधिकारी व उपविभागीय अधिकारी यांनी कंपनीवर छापा टाकून पकडले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनीतील सांडपाणी व रासायनिक पाण्याची विल्हेवाट करण्याची व्यवस्थाही कंपनीकडे नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कंपनी व्यवस्थापनावर महाराष्ट्र प्रदुषणा नियंत्रण मंडळाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे वा याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१७-०३-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
सदर कंपनीकडे उद्योगाच्या उत्पादन प्रक्रियेतून निघणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरीता प्राथमिक, व्दितीय स्वरुपाची सयंत्रणा उभारलेली आहे.
(३) सदर उद्योगाने उद्योग उभारणी करण्यासाठी दिलेल्या संमतीपत्रातील अटी व शर्तींचे उल्लंघन केल्यामुळे उद्योग बंद करण्याबाबतचे आदेश दि.१३.४.२०१६ रोजी पारीत करण्यात आले आहेत.

तद्नंतर उत्पादन प्रक्रिया चालू करण्यासाठी केलेल्या विनंतीनुसार दि.२०.४.२०१६ रोजी सदर उद्योगाच्या प्रदूषण नियंत्रण संयंत्रणेची तपासणी करुन याबाबतच्या तांत्रिक बाबीबाबत दि.२६.४.२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली व तद्नुसार उद्योगास उत्पादन प्रक्रिया चालू करण्याबाबत परवानगी देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भ‌ावत नाही.

---

**नांदगाव (जि.नाशिक) येथील शाकांबरी नदीपात्रात अवैध वीटभट्ट्या सुरु असल्याबाबत**

**(७) ५७७६३ (१०-०८-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगाव (जि.नाशिक) येथील शाकांबरी नदीपात्रातच पर्यावरणाच्या नियमांचे उल्लंघन करून अवैध वीटभट्ट्या सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वीट भट्ट्यामधून सल्फरडाय ऑक्साईड, कार्बन डायऑक्साईड, कार्बन मोनाक्साईड सारख्या विषारी वायूंचे उत्सर्जन होत असल्याने परिसरातील नागरिकांना डोक्याचे विविध विकार, श्वसनाचे आजार, त्वचेचे रोग झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०६-०४-२०१७) :** (१) शाकांभरी नदीपात्रातच पर्यावरणाच्या नियमांचे उल्लंघन करून एकुण सात अवैध वीट भट्ट्या उभारण्यात आल्या आहे, हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही. वैद्यकिय अधिक्षक, ग्रामिण रुग्णालय , नांदगाव जि. नाशिक यांच्या अहवालानुसार नांदगाव जि नाशिक येथील शांकंबरी नदीपात्रात असणाऱ्या विट भट्टांच्या सभोतालच्या परिसरात राहात असलेल्या लोक वस्तीतील लोकांस डोक्याचे, श्वसनाच्या आजरांचे, त्वचेच्या रोगांचे व विविध प्रकारांच्या आजारांचे रुग्ण ग्रामीण रुग्णलय नांदगाव येथे आजपावेतो दाखल झालेले नाहीत.

शाकांभरी नदी पात्रात अनधिकृत अतिक्रमण व वीटभट्टया या नगरपरिषद हद्दीत असल्याने तहसिलदार, नांदगांव यांनी मुख्याधिकारी, नांदगांव नगरपरिषद, नांदगांव यांना सदरचे अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत नोटीस दिली आहे. मुख्याधिकारी, नांदगाव नगर परिषद यांनी अतिक्रमण काढणेकामी पोलिस बंदोबस्त मागणी केली आहे. पोलिस बंदोबस्त मिळताच महसूल विभाग व पोलीस प्रशासन यांचे सहाय्याने अतिक्रमण काढण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भ‌ावत नाही

---

## पालघर जिल्ह्यात अन्न व औषध प्रशासनाचे कार्यालय स्थापन करण्याबाबत

**(८) ५७८८९ (०५-०८-२०१६). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हा सन २०१४ मध्ये अस्तित्वात येवून अद्याप अन्न व औषध प्रशासनाचे कार्यालय अस्तित्वात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात गुटखाबंदी असल्याने शेजारील भागातून मुंबई ठाण्यासारख्या शहरासाठी पालघर तलासरी मार्गे गुटखा तसेच अन्य अवैध भेसळयुक्त पदार्थाची चोरटी वाहतूक होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी अन्न व औषध प्रशासनाचे कार्यालय अस्तित्वात नसल्याने यावर निर्बंध राखणे कठीण आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याभागातील वाढती लोकसंख्या विचारात घेता सदर विभागाचे कार्यालय स्थापन करण्याबाबत प्रश्न भाग (२) मधील प्रकारास प्रतिबंध घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०१-०६-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.सह आयुक्त कोकण विभाग यांच्या ठाणे येथील कार्यालयातून पालघर जिल्ह्याचे कामकाज पाहिले जाते.

(४) प्रशासनाद्वारा पालघर जिल्ह्यांसाठी अन्न व औषध प्रशासनाचे स्वंतत्र कार्यालयाच्या जागेसाठी जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे दि. १२/८/२०१४ रोजी प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. तसेच प्रशासनाच्या सुधारित आकृतिबंधाच्या प्रस्तावामध्ये पालघर येथील कार्यालयासाठी नवीन पदे निर्माण करण्याच्या प्रस्तावाचा समावेश आहे व सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भ्‍ावत नाही.

---

## मुंबई शहरातील वाढते प्रदुषण, जागेची कमतरता व गर्दी मुळे शहरात अस्थमा होण्याचे प्रमाण वाढत असल्याबाबत

**(९) ५८०९७ (१०-०८-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील वाढते प्रदुषण, जागेची कमतरता, गर्दी मुळे शहरात अस्थमा होण्याचे प्रमाण वाढत असून मुंबईतील १२ टक्के तरुणांना अस्थमाचा त्रास जडला असल्याचे दिनांक ३ मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जागतिक अस्थमा दिनानिमित्त केलेल्या सर्वेक्षणा दरम्यान तज्ञ डॉक्टरांनी मत व्यक्त्‍ा केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रदुषणामुळे मुंबई शहरात वाढत असलेल्या अस्थमावर नियंत्रण मिळविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०६-०४-२०१७) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे community मध्ये जाऊन सर्वेक्षण केले जाते. तसेच अस्थमा रुग्णांना रुग्णशिक्षण, निदान व उपचार पुरविले जातात.मुंबई शहरातील के.ई.एम. रुग्णालयातील पर्यावरण प्रदूषण संशोधन विभागातर्फे कार्यव्याप्ती वाढविण्याकरिता National Environment and lung Health Research Institute करिता आराखडा तयार करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चोपडा (जि.जळगाव) तालुक्यातील क्षारयुक्त दुषित पाणी बाधित असलेल्या गावांमध्ये आर.ओ.सिस्टीम बसविण्यासाठी निधी उपलब्ध करणेबाबत

**(१०) ६०३०६ (१०-०८-२०१६). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चोपडा (जि.जळगाव) तालुक्यातील क्षारयुक्त दुषित पाणी बाधित असलेल्या गावात आर.ओ.सिस्टीम बसविण्यासाठी निधी उपलब्ध होण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ फेब्रुवारी, २०१६ रोजी व त्यानंतर अनेक वेळा मा.पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री यांना पत्रव्यवहाराद्वारे मागणी करुनही अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे धानोरा, गोरगावले बु. वढोदा, सनपुले, गोरगावले खुर्द, कोळंबा,कठोरा, कुरवेल, किनगांव बु, ता.यावल, किनगांव खुर्द, न्हावी, दहिगांव आदि गावांना दुषित पाणी पुरवठा होत असल्याने नागरिकांना किडनीचे विकार उद्‌भवत असून त्यांच्या जिवीतास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त गावांमध्ये आर ओ सिस्टीम बसविण्याबाबत तात्काळ निधी उपलब्ध करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१३-०४-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद जळगाव यांच्यामार्फत पिण्याच्या पाण्याची रासायनिक तपासणी अभियान राबविले असता सदर अभियानात नमूद गावांमध्ये नायट्रेटचे प्रमाण आढळून आले असल्याचा अहवाल संबंधित प्रयोगशाळेने सादर केलेला आहे. आरोग्य विभागाकडून केलेल्या सर्वेक्षणानुसार सदर गावांमध्ये किडणीचे विकार उद्‌भवलेले नाहीत.

(३) उक्त गावांपैकी कठोरा ग्रामपंचायतीचा आर.ओ.सिस्ट्रीम बसविण्याबाबत १४ व्या वित्त आयोगाच्या कृती आराखड्यात समावेश केलेला आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.जळगाव यांनी आर.ओ.सिस्टीम ५०० लीटर/ताशी ते ४००० लीटर/ताशी सन २०१६-१७ चे किमान दरास मंजूरी दिली असून ग्रामपंचायतीस १४ व्या वित्त आयोगाकडून आर.ओ. सिस्टीम घेण्याबाबत सर्व ग्रामीण पाणी पुरवठा उपविभागास कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खराबवाडी (ता.खेड, जि.पुणे) येथे रेकोल्ड महाराष्ट्र नॅचरल गॅस कंपनीमधून झालेली गॅसची गळती**

**(११) ६२७८४ (१०-०८-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खराबवाडी (ता.खेड, जि.पुणे) येथील रेकोल्ड महाराष्ट्र नॅचरल गॅस कंपनीमधून माहे जून २०१६ मध्ये वा त्यादरम्यान गॅसची गळती झाली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गॅस गळतीमुळे गावातील शेकडो लोकांना त्रास झाल्याने गळती बंद करणेबाबत तसेच संबंधित दोषी कंपनी व अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०६-०४-२०१७) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
ग्रामीण रुग्णालय, चाकण यांनी दिनाक १३.०७.२०१६ च्या पत्रान्वये गॅस गळतीमुळे बाधित झालेला रुग्ण उपचाराकरता सदरील रुग्णालयात दाखल झालेला नाही असे कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अंधेरी (मुंबई) या पश्चिम उपनगरात भेसळयुक्त दुधाची होत असलेली विक्री**

**(१२) ६५६१० (१६-१२-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विशेषतः अंधेरी (मुंबई) येथील पश्चिम उपनगरात जवळपास १५० लिटर भेसळयुक्त दुधाचा सर्रास वापर केला गेल्याने जुहू, विले पार्ले, इर्ला जंक्शन येथील दुग्ध व्यावसायिक व्यापाऱ्यास़ भेसळयुक्त दुध व चढ्याभावाने दुध विक्रीच्या आरोपाखाली अटक करण्याची मागणी तेथील स्थानिक नागरिक, सेवाभावी संस्था, स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच आसपासच्या क्षेत्रातील रहिवाशी संघटना यांच्यावतीने मा. अन्न व औषध प्रशासन मंत्री,

मा.अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्री, अतिरिक्त मुख्य सचिव, अन्न व औषध प्रशासन, विभागीय अन्न व औषध प्रशासन संचालनालय तसेच संबंधित उपनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आणि संबंधित महानगरपालिका आयुक्त व इतर तत्सम अधिकाऱ्यांकडे दिनांक १७ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी अन्न व औषध प्रशासन विभागाच्यावतीने तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी व जागृत नागरिकांच्या संघटनेने वेळोवेळी निदर्शनास आणली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (३१-०३-२०१७) :** (१) लेखी निवेदनाव्दारे अशा आशयाची मागणी अन्न व औषध प्रशासनास प्राप्त झाल्याची बाब खरी नाही. तथापि दि. १४/०९/२०१६ रोजी मुंबईतील जुहू गल्ली परिसरात एक ईसम दुधाच्या पिशव्या फोडून त्यात पाण्याची भेसळ करीत असल्याची बाब जुहू पोलीसांकडून अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आणण्यात आली होती.

(२) हे खरे नाही.

(३) दि. १४/०९/२०१६ रोजी मुंबईतील जुहू गल्ली परिसरात एक ईसम दुधाच्या पिशव्या फोडून त्यात पाण्याची भेसळ करीत असल्याची बाब जुहू पोलीसांकडून अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आणण्यात आली. त्यानुषंगाने प्रशासनाव्दारे सदर ठिकाणी कारवाई करून दुधाच्या पिशव्यातून नियमाप्रमाणे दोन नमुने विश्लेषणासाठी घेऊन उर्वरित ११६ लिटर दूध जप्त करून नष्ट करण्यात आले. सदर ईसमाविरूध्द जुहू पोलीस ठाण्यात एफआयआर क्र. ४९५/१६, दि. १४/०९/२०१६ रोजी दाखल करण्यात आला आहे. विश्लेषणासाठी घेण्यात आलेले नमुने मानदाप्रमाणे नसल्याचे घोषित झालेले असल्याने त्याप्रकरणी अन्न सुरक्षा व मानदे कायद्यांतर्गत न्यायनिर्णय खटला दाखल करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भावत नाही.

---

### अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील पेझारी येथे टँकरमधून अमोनिया वायुची गळती झाल्याबाबत

**(१३) ६५९८३ (१६-१२-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील आर.सी.एफ थळ कंपनीमधून अनेक टँकर (कॅप्सूल) अमोनियाची वाहतूक करतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ३ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास पहाटे साडेचार वाजता पेझारी येथे टँकरमधून अमोनिया वायूची गळती झाली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर टँकरमधून अमोनिया वायूची गळती सुरू होताच टँकरच्या ड्रायव्हरने कोणतीही सूचना न देता त्याने पलायन केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त परिसरातील जागृत नागरीकांमुळे मोठी जिवित व वित्तहानी टळली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास,या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०६-०४-२०१७) :** (१), (२), (३) व (४) हे खरे आहे.

(५) होय.

सदर टँकरचा ड्रायव्हर व आरसीएफ कंपनीचे सुरक्षेकरिता जबाबदार अधिकारी यांनी योग्य काळजी न घेतल्याने व हयगय केल्याने दिनांक ०४.१०.२०१६ रोजी सकाळी ४.५० ते ७.०० वाजण्याच्या दरम्यान टँकर क्रमांक एमएच ४६ एफ १२३६ मधून अमोनिया गॅस गळती होऊन पेझारी परीसरातील नागरिकांच्या जिवितास व व्यक्तिगत सुरक्षिततेस धोका पोहोचला असे आढळून आले आहे. तथापि योग्य वेळी टँकर हलविल्याने कोणत्याही प्रकारे जिवित अगर वित्त हानी झाली नाही. सद्यास्थितीत तांत्रिक तपासणी अहवालाबाबत कार्यवाही चालू आहे.

---

**कोल्हापूर जिल्हयातील साखर कारखान्यांवर नोटीसा बजावण्याचे दिलेले आदेश**

**(१४) ६६६८४ (१६-१२-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील पंचगंगा नदी खो-यातील जे साखर कारखाने क्षमतेपेक्षा जास्त गाळप करुन नियमांचे उल्लंघन करतात त्या कारखान्यांवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रदूषण नियंत्रणाच्या आवश्यक उपाययोजनांच्या बांधकामासाठी येणा-या खर्चाएवढी रक्कम बँक गॅरंटी म्हणून घ्यावी, अशा सूचना विभागीय आयुक्त यांनी देऊन त्या साखर कारखान्यांना नोटीसा बजावण्याचे आदेश प्रांताधिका-यांनी दिनांक ८ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यानुसार कोणकोणत्या साखर कारखान्यांना नोटीसा दिल्या आहेत व त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०६-०४-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) कोल्हापूर जिल्हयातील एकूण ८ साखर कारखान्यांना अनुक्रमे १) मे.डी.वाय.पाटील साखर कारखाना लि. गगनबावडा, २) मे.कुंभी कासारी सह. साखर कारखाना लि., कुडित्रे, ३) मे.रेणुका शुगर लि., गंगानगर, इचलकरंजी, ४) मे. भोगावती सह. साखर कारखाना लि., परिते, ५) मे.जवाहर सह. साखर कारखाना लि., हुपरी, ६) मे.छत्रपती राजाराम सह. साखर कारखाना, कोल्हापूर, ७) मे.दालमिया भारत शुगर लि. (दत्त शेतकरी सह. साखर कारखाना लि.), आसुर्ले-पोर्ले, पन्हाळा, ८) मे.श्री दत्त सह. साखर कारखाना, दत्तनगर, शिरोळ, यांना न्यायालयीन खटला दाखल करणे बाबत नोटीसा दिल्या आहेत व त्या अनुषंगाने त्या सर्व कारखान्यांवर खटले दाखल झालेले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

---

**रायगड जिल्हयात प्रतिबंधित, गुटखा, स्वादिष्ट, सुगंधित तंबाखू व पान मसाला यांचा साठा जप्त केल्याबाबत**

**(१५) ६६७४९ (१६-१२-२०१६). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हयात प्रतिबंधित गुटखा, स्वादिष्ट, सुगंधित तंबाखू व पान मसाला इत्यादींची छुप्या पध्दतीने विक्री होत असलेल्या ठिकाणी अन्न व औषध प्रशासनाच्या पेण कार्यालयाने स्थानिक नागरिक व पोलीस यांच्या मदतीने धाडी व जप्तीची कारवाई करून दिनांक २० जुलै, २०१२ पासून आतापर्यंत ३ कोटी ५३ लाख ३७ हजार ७५१ रुपयांचा प्रतिबंधित गुटखा, स्वादिष्ट, सुगंधित तंबाखू व पान मसाला यांचा साठा जप्त केल्याचे माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर धाडीसंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (३१-०३-२०१७) :** (१) रायगड जिल्हयात प्रतिबंधित गुटखा, स्वादिष्ट, सुगंधित तंबाखू व पानमसाला इत्यांदीची छुप्या पध्दतीने विक्री होत असल्याचे आढळल्यावरुन अन्न व औषध प्रशासनाव्दारे अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ अंतर्गत कारवाई करुन जुलै २०१२ ते सप्टेंबर, २०१६ या कालावधीत सदर प्रतिबंधित अन्नपदार्थाचा रु. ३ कोटी ५३ लाख ५२ हजार ७७ इतक्या किमतीचा साठा जप्त करण्यात आला.
(२) धाडी व जप्ती प्रकरणी जप्त केलेला साठा हा प्रतिबंधित अन्नदार्थाचा असल्याने या प्रकरणी अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ अतंर्गत चौकशी करण्यात आली असून चौकशीअंती एकूण ३२ प्रकरणी मा. न्यायालयात संबंधितांविरुध्द खटले दाखल करण्यात आले आहेत. तर ११ प्रकरणी तपास सुरु असून तपासाअंती न्यायालयीन कारवाई करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

---

**राज्यात केळी या फळांना पिकवण्याकरिता इथेनॉल या रसायनाचा होत असलेला वापर**

**(१६) ६६९१४ (१६-१२-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अन्न भेसळ प्रतिबंधक कायद्यांतर्गत इथेनॉल या रसायनाचा केळी या फळांना पिकवण्याकरिता बंदी असताना फळे पिकविण्यासाठी उक्त रसायनाचा वापर करण्यात येत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने घाऊक केळी विक्रेत्यांची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (३१-०३-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भ‍ावत नाही.

(३) प्रश्न उद्भ‍ावत नाही.

---

**राज्यातील अन्न व औषध प्रशासनाने जाहिरातीच्या माध्यमातून विकण्यात येणाऱ्या बनावट औषधांचा साठा जप्त केल्याबाबत**

**(१७) ६८६९४ (१६-१२-२०१६). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानसिक आजार, मधुमेह, लठ्ठपणा, लैंगिक कार्यक्षमता, उंची वाढविणे, स्त्रियांचे आजार, कॅन्सर आणि संधिवात बरा करण्याचा दावा करणाऱ्या औषधांच्या फसव्या जाहिराती प्रसिध्द होण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहमदनगरसह राज्यात आकर्षक जाहिरातीच्या माध्यमातून विकण्यात येत असलेल्या आरोग्यावर विपरीत परिणाम करणाऱ्या औषधी साठ्यांवर अन्न व औषध प्रशासनाने कारवाई करुन सुमारे १ कोटी ५२ लाख रुपयांची २६३ प्रकारची विविध औषधे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान जप्त केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा फसव्या जाहिरातीस भूलून सामान्य नागरीकांची फसवणूक होवू नये म्हणून अशा कंपन्यावर प्रतिबंध घालण्यासाठी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (३१-०३-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, राज्यात जाहिरातीच्या माध्यमातून विकण्यात येत असलेल्या आणि आरोग्यावर विपरीत परिणाम करणा-या औषधी साठ्यांवर अन्न व औषध प्रशासनाने कारवाई करून सुमारे १ कोटी ५२ लाख रूपयांची २६३ प्रकारची विविध औषधे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये जप्त केली आहेत. त्यामध्ये अहमदनगर येथील रू. ५३,३४०/- किमतीच्या औषधांचाही समावेश आहे. सदर प्रकरणी संबंधिताना प्रशासनातर्फे कारणे दाखवा नोटीस पाठविण्यात आली आहे. त्यानुषंगाने पुढील कारवाई करण्यात येईल.

(३) औषधे व जादूटोणादी (आक्षेपार्ह) जाहिराती कायदा १९५४ अंतर्गत औषधाच्या लेबलवर आक्षेपार्ह मजकूर तसेच औषधाबाबतच्या जाहिराती वृत्तपत्रात व दूरदर्शनवर प्रसिध्द करण्यांस अन्न व औषध प्रशासनाकडून प्रतिबंध करण्यात येतो. तसेच वेळोवेळी मोहिमा आखून फसव्या जाहिराती करणा-या व्यक्ती / कंपन्याचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय रुग्णालयांच्या औषध भांडारांमध्ये अनेक त्रुटी असल्याबाबत

**(१८) ६९२९४ (१६-१२-२०१६). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध भागातील शासकीय रुग्णालयांच्या औषध भांडारांमध्ये फार्मासिस्ट नाहीत व आक्षेपार्ह अशा अनेक त्रुटी तसेच मुदतबाहय औषधे इंजेक्शन अन्न व औषध प्रशासनाच्या गुप्तवार्ता विभागाच्या औषध निरीक्षकांना माहे ऑक्टोबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही रुग्णालयाच्या औषध भांडारात अस्वच्छता तसेच रुग्णालयाच्या अखत्यारितील १२ औषध भांडारांनी औषधे उसनवार पध्दतीने वितरित केली असल्याचे तसेच एकाच उत्पादकाची, एकाच प्रकारची औषधे विविध औषध भांडारांनी वेगवेगळया दरांना खरेदी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही रुग्णालयात तपासणी केली असता अभिलेखात नोंदीनुसार प्रत्यक्ष उपलब्ध साठयामध्ये तफावत आढळली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (३१-०३-२०१७) :** (१) दिनांक १४/१०/२०१६ रोजी अन्न व औषध प्रशासनाच्या गुप्तवार्ता विभागातील औषध निरीक्षकांनी विशेष मोहिम राबवून राज्यातील ११ शासकीय व निमशासकीय रूग्णालयातील औषधी भांडारांची तपासणी केली असता, त्यातील ०८

रूग्णालयातील औषधी भांडारात औषधे साठवणूक व वितरण याबाबत तसेच औषधी साठ्याचे अभिलेख ठेवताना औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यातील परिशिष्ट के मधील अटींचे उल्लंघन होत असल्याचे तपासणीदरम्यान आढळून आले. तर ०१ रूग्णालयातील औषधी भांडारात औषध विक्रीसाठी फार्मासिस्टची नियुक्ती केली नसल्याचे आढळून आले.

(२) तपासणी करण्यात आलेल्या ११ शासकीय व निमशासकीय रूग्णालयातील औषधी भांडारांपैकी ०३ ठिकाणी अस्वच्छता आढळून आली. तर एकाही ठिकाणी औषधे उसनवार पध्दतीने वितरीत केली असल्याचे तसेच एकाच उत्पादकाची, एकाच प्रकारची औषधे विविध औषध भांडारानी वेगवेगळ्या दरांना खरेदी केल्याचे  निदर्शनास आले नाही.

(३) तपासणी करण्यात आलेल्या ११ शासकीय व निमशासकीय रूग्णालयातील औषधी भांडारांपैकी केवळ नागपूर येथील इ.एस.आय.एस रूग्णालयाच्या औषध भांडारात अभिलेखातील नोंदीनुसार औषध साठा व प्रत्यक्ष उपलब्ध औषध साठा यात तफावत आढळून आली.

(४) राज्यातील शासकीय व निमशासकीय रूग्णालयातील औषधी भांडारांचे नियंत्रण अन्न व औषध प्रशासनाच्या अखत्यारित येत नाही. त्यामुळे तपासणीदरम्यान आढळून आलेल्या त्रुटींबाबत अन्न व औषध प्रशासनाकडून रूग्णालयाच्या संबंधित अधिका-यांना पत्राव्दारे कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात भेसळयुक्त आणि कृत्रिम दूध विक्री होत असल्याने सर्वोच्च न्यायालयाने कायदा करणेबाबत दिलेले निर्देश**

**(१९) ६९४१५ (१६-१२-२०१६). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात  भेसळ युक्त आणि कृत्रिम दूधाची विक्री मोठ्या प्रमाणावर होत असल्याने मा.सर्वोच्च न्यायालयाने या विषयी कठोर कायदा करणेबाबत निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यात होणारी भेसळ युक्त दूध विक्री नियंत्रित करुन कठोर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (३१-०३-२०१७) :** (१) उत्तराखंड राज्यातील अच्युतानंद तीर्थ व इतर यांनी केंद्र सरकारला प्रतीवादी करून मा. सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका क्र. १५९/२०१५ दाखल केली होती. सदर याचिकेच्या सुनावणीच्या वेळी मा. सर्वोच्च न्यायालयाने संपूर्ण देशातील दुध भेसळीस आळा बसावा म्हणून अन्न सुरक्षा मानके कायदा, २००६ अंतर्गत प्रभावी अंमलबजावणीसाठी योग्य ती पावले उचलावीत असे आदेश केंद्र व  राज्य  सरकार यांना दिले आहेत.

(२) मा.सर्वोच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. १५९/२०१५ मध्ये दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने दुध भेसळीवर नियंत्रण ठेवण्याचे निर्देश राज्यातील सर्व अंमलबजावणी अधिकारी यांना देण्यात आले आहेत.

दूध भेसळीस आळा बसावा याकरिता अन्न व औषध प्रशासनाव्दारे नियमीतपणे दुधाचे नमुने घेणे, दुधाच्या भेसळीची दाट शक्यता असलेली क्षेत्रे ओळखून कारवाई करणे तसेच विशेष मोहिमा राबविणे यासारख्या उपाययोजना  करण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भ्‍ावत नाही.

---

**कागल-हातकणंगले (जि.कोल्हापूर) पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमधील काही कंपन्यांनी रसायन मिश्रीत पाणी तळंदगे येथील ओढयात सोडल्याच्या तक्रारीबाबत**

**(२०) ६९६०० (१६-१२-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कागल-हातकणंगले (जि.कोल्हापूर) पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमधील काही कंपन्यांनी रसायन मिश्रीत पाणी तळंदगे येथील ओढयात सोडल्याची तक्रार शेतक-यांनी संबधित कारखान्यांकडे व प्रशासनाकडे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. रामदास कदम (१७-०४-२०१७) :** (१) याबाबतची तक्रार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झाली नाही. तथापि, दि.२७.७.२०१६ रोजी स्थानिक वर्तमानपत्रात याबाबतची बातमी प्रसिद्ध झाली होती.

(२) सदर बातमीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिका-यांनी दि.२७.७.२०१६ रोजी कागल-हातकणंगले पंचतारांकित औद्योगिक वसाहतीची पाहणी केली. पाहणीदरम्यान औद्योगिक वसाहतीमधील कोणत्याही कंपनीचे सांडपाणी तळदंगे ओढ्यात अथवा नाल्यात सोडल्याचे आढळून आले नाही. तथापि,औद्योगिक वसाहतीतील सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेचे प्रक्रियाकृत सांडपाणी HRTS मधून तळंदगे ओढ्यात  जात असल्याचे आढळून आले.

उपरोक्त घटनेच्या अनुषंगाने औद्योगिक वसाहतीतील सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेस दि.२८.७.२०१६ रोजी समजपत्र देण्यात आले. त्याचप्रमाणे महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ, कोल्हापूर यांना औद्योगिक वसाहतीतील सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेचे प्रक्रियाकृत सांडपाणी HRTS मधून तळंदगे ओढ्यात  जाण्यापासून थांबविण्यासाठी योग्य ती उपाययोजना करण्याबाबत सूचित केले आहे.

(३) प्रश्न उद्भ्‍ावत नाही.

---

**बोईसर (जि.पालघर) येथे प्रदूषण नियंत्रण मंडळाचे कार्यालय स्थलांतरीत करण्याची मागणी**

**(२१) ६९८९६ (१६-१२-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्याची स्थापना होऊन २ वर्षे होऊन देखील प्रदुषण नियंत्रण मंडळाचा कारभार अद्यापही कल्याण येथून होत आहे, सदरहु कार्यालय बोईसर येथे जनतेच्या सोईसाठी स्थलांतरीत करावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी तसेच विविध पक्षाच्या नेत्यांनी दिनांक २४ ऑगस्ट २०१६ रोजी वा त्यासुमारास पालघर जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कार्यालय अद्यापही पालघर जिल्ह्यात स्थलांतरीत न झाल्यामुळे वाडा तालुक्यातील शेतकरी व नागरिकांना प्रदुषणा संदर्भात कोणतीही तक्रार करावयाची असल्यास कल्याणला जावे लागते व परिणामी तक्रारीकडे लक्ष दिले जात नाही तसेच प्रदूषणामुळे अनेक समस्या स्थानिक स्तरावर निर्माण होतात, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच बोईसर येथे प्रदूषण नियंत्रण मंडळाचे कार्यालय स्थलांतरीत करण्याबाबत तसेच येथील प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यकक्षेस वाडा तालुक्याचा समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०२-०५-२०१७) :** (१) होय हे खरे आहे.

(२) वाडा तालुक्यातून जानेवारी, २०१६ पासून १८ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या सर्व तक्रारींचे निरसन उप प्रादेशिक कार्यालय, कल्याण-३ यांच्याकडून करण्यात आलेले आहे.

उप प्रादेशिक कार्यालय, कल्याण-३ अंतर्गत मुरबाड व शहापूर तालुकेही येतात. त्यामुळे या तिन्हीं तालुक्यासाठी कल्याण हे मध्यवर्ती ठिकाण म्हणून सोयीस्कर आहे.

(३) वाडा तालुक्याचा कार्यभार बोईसर येथील कार्यालयाच्या अखत्यारित समाविष्ट करण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या विचाराधिन आहे.

(४) प्रश्न उद्भावत नाही.

---

**राज्यातील बेकायदा सुरू असलेल्या ऑनलाईन औषध विक्री विरोधात करावयाच्या कारवाईबाबत**

**(२२) ७००३५ (१६-१२-२०१६). श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बेकायदा सुरू असलेल्या ऑनलाईन औषध विक्री विरोधात राज्याच्या अन्न व औषधी द्रव्ये प्रशासनाने दिनांक १ जानेवारी, २०१६ ते ३० सप्टेंबर, २०१६ या कालावधीत औषध पुरवठादार कंपन्या व एजन्सीजवर धाडी टाकल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त किती बेकायदा ऑनलाईन औषध विक्रेत्यांवर कारवाई केली आहे व त्या कंपन्यांची नावे काय आहेत तसेच त्यांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत काय व सुरू असलेल्या कारवाईची सद्य:स्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (३१-०३-२०१७) :** (१) होय हे खरे आहे, ऑनलाईन औषध विक्री करणा-या विक्रेत्यांवर औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्या अंतर्गत नियम, १९४५ मधील विविध तरतुदींच्या उल्लंघनाबाबत प्रशासनाव्दारा कारवाई करण्यात आली .
(२) प्रशासनाव्दारे ऑनलाईन औषध विक्री प्रकरणी औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्या अंतर्गत नियम, १९४५ मधील विविध तरतुदींच्या उल्लंघनाबाबत खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली.

०७ पेढ्यांविरूध्द पोलीसांत प्रथम खबरी अहवाल

०१ पेढीविरूध्द खटला दाखल

१२ पेढीचे परवाने रद्द

०६ पेढीचे परवाने निलंबन

०६ प्रकरणी परराज्यातुन औषध पुरवठा झाल्याने संबंधित राज्याच्या औषध नियंत्रकांना कळविण्यात आले आहे.

०३ पेढ्यांना कारणे दाखवा नोटीस

०१ प्रकरणी पेढीचा परवाना निरस्त

(३) प्रश्न उद्भावत नाही.

---

**राज्यात बंदी असलेल्या देश-विदेशातील शीत पेय व खाद्य पदार्थांच्या विविध कंपन्या जाहीरात करुन मोठ्या प्रमाणात विक्री करीत असल्याबाबत**

**(२३) ७०२९९ (१६-१२-२०१६). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात बंदी असलेल्या देश-विदेशातील शीत पेय व खाद्य पदार्थांच्या विविध कंपन्या आपल्या मालाची विक्री होण्यासाठी माध्यमांद्वारे जाहीरात करुन मोठ्या प्रमाणात विक्री करीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कंपन्याची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (३१-०३-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भावत नाही.
(३) प्रश्न उद्भावत नाही.

---

## अमरावती जिल्ह्यातील रघुवीर प्रतिष्ठान विक्री केंद्रामार्फत हानिकारक अन्नपदार्थांची होत असलेली विक्री

**(२४) ७०३०६ (१६-१२-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील रघुवीर प्रतिष्ठान विक्री केंद्र अन्न व औषध प्रशासनाच्या नियमाचे उल्लंघन करुन सामान्य नागरिकांच्या आरोग्याला बाधा पोहोचविणाऱ्या अन्नपदार्थाची विक्री करीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (३१-०३-२०१७) :** (१) दि. १५/०९/२०१६ रोजी अन्न व औषध प्रशासनास रघुवीर प्रतिष्ठान, अमरावती या पेढीतून विक्री करण्यात आलेल्या कचोरीत अळी निघाल्याबाबतची लेखी तक्रार प्राप्त झाली होती. मात्र सदर तक्रारदाराने अशा प्रकारची कोणतीही कचोरी प्रशासनाच्या अधिका-यांना दाखविली नाही.

(२) सदर तक्रारीच्या अनुषंगे प्रशासनाव्दारे दि. १५/०९/२०१६ रोजी मे. रघुवीर प्रतिष्ठान विक्री केंद्र, श्याम चौक, अमरावती या पेढीची तपासणी करण्यात आली. तक्रारदाराने नमूद केलेली कचोरी ही दि. १४/०९/२०१६ रोजी विकत घेतली असून तपासणी दरम्यान सदर कचोरीचा साठा उपलब्ध नव्हता. तथापि सदर पेढीत अन्नपदार्थ तयार करण्यासाठी वापरण्यात येणा-या मैदा, बेसन, शेंगदाणा या कच्च्या अन्न पदार्थांचे ३ नमुने विश्लेषणार्थ घेण्यात आले. पेढीच्या तपासणीदरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगे पेढीविरूध्द अन्न सुरक्षा व मानदे कायद्यांतर्गत न्यायनिर्णय खटला क्र. ३८/२०१६ दि. ०५/११/२०१६ रोजी दाखल करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सातारा जिल्ह्यातील पुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांचा अतिरिक्त कामाचा भार कमी करण्याबाबत

**(२५) ७०३१५ (१६-१२-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील अन्न धान्य पुरवठा शाखेमध्ये धान्य वितरणाबरोबर गॅस, शिधापत्रिका नुतनीकरण इत्यादी कामाची जबाबदारी सोपविण्यात आल्यामुळे कर्मचारी वर्गावर कामाचा अतिरिक्त भार पडत आहे तसेच अन्न धान्य पुरवठा विभागात सध्या सुरु असलेला टक्केवारीचे प्रमाणात वाढ झाली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने कर्मचाऱ्यांचा अतिरिक्त कामाचा भार कमी करण्याबाबत व टक्केवारी थांबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०४-०५-२०१७) :** (१) व (२) सातारा जिल्हयातील पुरवठा शाखेमधील मंजूर असलेली सर्व पदे भरलेली आहेत. सातारा जिल्हयाच्या पुरवठा शाखेमध्ये टक्केवारीचा सुळसुळाट सुरू असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही
(३) प्रश्न उद्‍भ्‍ावत नाही

---

**राज्य शासनाच्या अन्न व औषध प्रशासनाकडून औषध निर्यातीत होणारे हस्तक्षेप**

**(२६) ७०७१७ (१६-१२-२०१६). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या अन्न व औषध प्रशासनाने औषध निर्यातीत हस्तक्षेप करून निर्यातदारांचे परवाने सन २०१५-१६ ह्या वर्षात रद्द करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र शासनाच्या DY. DIRECTOR GENERAL, INTERNATIONAL RELATION & GLOBAL BUSINESS, NEW DELHI यांनी दिनांक ०५ जून, २०१४ रोजी लेखी पत्र देऊन सदर विषय केंदाचा असून राज्य शासनाने हस्तक्षेप करू नये असे कळविलेले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त केंद्र शासनाच्या लेखी पत्रानंतरही अन्न व औषध प्रशासना कडून औषध निर्यातीत हस्तक्षेप करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (३१-०३-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) मुख्य पोस्ट मास्टर जनरल, मुंबई विभाग यांनी दि. २५/०६/२०१४ रोजी आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांना पाठविलेल्या अर्धशासकीय पत्रात DY. DIRECTOR GENERAL, INTERNATIONAL RELATION & GLOBAL BUSINESS, NEW DELHI यांच्या दि. ०५/०६/२०१४ च्या पत्राचा संदर्भ देऊन आंतरराष्ट्रीय टपाल / पार्सल तपासणीबाबत Central Board of Excise And Custom Manual २०१४ आणि Foreign post guide part II Department of post para १८०, section IX Custom Control मध्ये नमुद कार्यपध्दतीत राज्य शासनाच्या अधिका-यांना प्राधिकार नसल्याचे कळविले आहे.
(३) औषध व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० मधील कलम २२ अंतर्गत प्रशासनातील औषध निरीक्षकांना प्राधिकार प्राप्त आहेत. सदर कायद्याच्या कलम १८ (सी) व नियम ६५ अंतर्गत तरतुदींच्या अधीन राहून औषध पुरवठा, साठा, विक्री वितरण करणे आवश्यक आहे. अशा तरतुदींचे उल्लंघन करणा-या संस्थांविरूध्द प्रशासनाने कारवाई घेतली आहे.

---

## मालवण (जि.सिंधुदुर्ग) क्षेत्र सी व्ही सी ए मधून वगळण्याबाबत

**(२७) ७१९७७ (१६-१२-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (ज़ि सिंधुदुर्ग) शहराचा समावेश सीआरझेड २ या वर्गवारीत करून सदर मालवण क्षेत्र सी व्ही सी ए मधून वगळण्याचा प्रस्ताव मालवण नगरपरिषदेकडून राज्य शासनास पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने पर्यावरण विभागाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, याबाबत मालवण क्षेत्र सी व्ही सी ए मधून वगळण्याबाबत राज्य शासनाचे धोरण काय आहे त्याचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१७-०४-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) पर्यावरण विभागामार्फत दि. ४.७.२०१५ रोजीच्या पत्रान्वये केंद्रिय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांना मालवण क्षेत्र हे पर्यावरण दृष्ट्या अतिसंवेदनशील क्षेत्र (सी.व्हि.सी.ए) मधून सी.आ.र.झेड.-२ वर्गवारीत समाविष्ट करण्याबाबत शिफारस करण्यात आली आहे.

(३) मालवण क्षेत्र सी.व्ही.सी.ए.मधून वगळण्याबाबतची बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीतील असून सद्यस्थितीत सदर प्रस्ताव केंद्र शासनाकडे विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भुसावळ (जि.जळगांव) येथील रामदास आठवले मागासवर्गीय सहकारी संस्थेविरुध्द कारवाई करण्यास होत असलेला विलंब

**(२८) ७३०५४ (१६-१२-२०१६). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामदास आठवले मागासवर्गीय सहकारी संस्थेविरुध्द गुन्हा दाखल करण्याचे पत्र तहसिलदार, भुसावळ यांनी दिनांक ६ ऑगस्ट, २०१६ रोजी मा.मंडळ अधिकारी यांना देवून दिनांक १ एप्रिल, २०१६ पर्यंत कोणतीही कारवाई न झाल्याने जिल्हा पुरवठा अधिका-यांनी तहसिलदार, भुसावळ यांच्याकडे पत्रान्वये विचारणा केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने कारवाईचे आदेश देवूनही अद्यापी दुकानदार व संस्था चालकांविरुध्द कारवाई न करणा-या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०६-०५-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) रामदास आठवले मागासवर्गीय सहकारी संस्था, मौजे पिंप्रीसेकम ता. भुसावळ जि.जळगांव या संस्थेची चौकशी करण्यात आलेली आहे. या संस्थेविरुध्द दिनांक २९.११.२०१६ रोजी गुन्हा र.क्र.३०४८/२०१६ दाखल करण्यात आला आहे. सकृतदर्शनी संस्था दोषी आढळल्याने संस्थेचे स्वस्त धान्य दुकानाचे प्राधिकारपत्र रद्द करण्यात आलेले आहे.

---

**तारापूर औद्योगिक वसाहतीतील बॉम्बे रेयॉन मुद्रा लाईफ स्टाईल रिजलॉस स्पेशालिटी कंपनीवर कारवाई करण्याबाबत.**

**(२९) ७३०५८ (१६-१२-२०१६). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औद्योगिक वसाहतीतील बॉम्बे रेयॉन मुद्रा लाईफ स्टाईल रिजलॉस स्पेशालिटी कंपनी यांना महाराष्ट्र प्रदूषण महामंडळाने कंपनी बंदच्या नोटीस बजावल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रदूषण मंडळाने कंपनी बंदची नोटीस बजावून पुढे कोणतीही कारवाई केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने दोषी आढळणा-या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०६-०४-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) म.प्र.नि. मंडळाकडून उपरोक्त मे. बॉम्बे रेयॉन, मुद्रा लाईफ स्टाईल व मे. रेझोन्सस स्पेशालिटी उद्योगांची सुनावणी दिनांक २६/१०/२०१६ रोजी घेण्यात आली व त्यांना पर्यावरणपूरक नवीन अटी शर्तीसह उत्पादन प्रक्रिया पूर्ववत ठेवण्याबाबत आदेश देण्यातआले.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पिंपरी (जि.ठाणे) येथील गर्ग व लक्ष वेअर हाउसिंग कंपनीच्या गोदामातील मसूर आणि पिवळा वाटाण्याच्या मालाचा झालेला अपहार**

**(३०) ७४२१९ (२०-०४-२०१७). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी (जि.ठाणे) येथील गर्ग व लक्ष वेअर हाउसिंग पिंपरी येथे कंपनीच्या गोदामात ठेवण्यात आलेल्या मसूर आणि पिवळा वाटाण्याच्या मालाचा परस्पर अपहार केला असल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीचे मॅनेजर निखील अग्रवाल, रोखपाल वैभव अग्रवाल आणि हेमंत टिपरीवाल यांच्यावर शीळडायघर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितावंर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२४-०५-२०१७) :** (१) व (२) हे खरे आहे.

पिंपरी येथील गर्ग व लक्ष वेअर हाउसिंग कंपनीच्या गोदामात ठेवण्यात आलेल्या मसूर आणि पिवळ्या वाटाण्याच्या मालाचा परस्पर अपहार केला असल्याचे निदर्शनास आले. तथापि, सदरची घटना ही खाजगी व्यापाऱ्यांमधील परस्पर व्यवहारातून घडल्याचे निदर्शनास आले.

सदर प्रकरणी फसवणूक झाल्याने, श्री.संदीप गोयल यांनी श्री.निखील अग्रवाल, श्री.वैभव अग्रवाल तसेच रोखपाल श्री.हेमंत टिपरीवाल यांच्याविरुद्ध शिळ डायघर पोलीस स्टेशन येथे भा.द.वि.सं. कलम ४२०, ४०६, ५०७, ३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. त्यास अनुसरुन पुढील तपास सुरु आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी पुरवठा कार्यालयाकडून कार्यवाही करण्यात आली नसून, खाजगी व्यापाऱ्यांमधील परस्पर व्यवहारामधून गुन्हा दाखल झाला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे (जि.पुणे) शहरात एच.पी गॅस कर्मचाऱ्यांकडून घरगुती गॅसची होत असलेली चोरी**

**(३१) ७४३९३ (२०-०४-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे (जि.पुणे) शहरात एच.पी गॅस कर्मचाऱ्यांकडून घरगुती गॅस चोरीचे रॅकेट माहे डिसेंबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहरात साधारणत: १० टाक्यांमागे एका टाकीत गॅस चोरी होत असून अशा प्रकारच्या चोरी प्रकारांमुळे जीवितहानी होण्याच्या प्रमाणामध्ये वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गॅस चोरीच्या प्रकारात वाढ होत असतांना काही दिवसांपूर्वीच अशाच एका घटनेत एका नागरिकाचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त गॅस चोरी प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२३-०५-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) दि.२२/१२/२०१६ रोजी मे.माऊली गॅस सेल्स सर्व्हिस, तापकीर चौक काळेवाडी येथील दुकानाची तपासणी केली असता, सदर दुकानामध्ये गॅस रिफीलींगचे अनधिकृत काम चालत असल्याचे आढळून आल्याने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३ व ७ नुसार एफआयआर क्र.३००१/२०१७ दि. ०२/०१/२०१७ अन्वये माऊली गॅस एण्ड सेल्स सर्व्हिस काळेवाडी यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच पुणे शहरात गॅस चोरीत एका नागरिकाचा मृत्यू झाल्याची घटना घडलेली नाही.

देहूरोड गॅसचा स्फोट झाल्यामुळे घराचे व घरातील सामानाचे नुकसान झाले होते. त्यामुळे देहूरोड कोहली गॅस एजन्सीने दि. ३०/१२/२०१६ रोजी एफ.आय.आर. ची नोंद केली असून, मे. आयसीआयसीआय लोमबार्ड जनरल इन्शुरंस कंपनी यांचेकडे दावा दाखल केलेला आहे.

---

**राज्यशासनाने धानपिकाला जाहीर केलेल्या बोनसमधून ५० क्विंटलची अट काढून शासन निर्णयात उन्हाळी धानाचा उल्लेख करणेबाबत**

**(३२) ७४८२३ (२१-०४-२०१७). श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यशासनाने खरीप हंगामातील धानपिकाला ५० क्विंटलपर्यंत प्रोत्साहन राशी म्हणून २०० रु. प्रति क्विंटल बोनस जाहीर केला असून हा बोनस दिनांक ३१ मार्च,२०१७ रोजीपर्यंत म्हणजे खरीप हंगामापुरताच मर्यादीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खरीप हंगामातील धान उत्पादक शासन निर्णयातून ५० क्विंटलची अट काढून त्यात उन्हाळी धानाचाही उल्लेख करण्याची मागणी शेतकरी करीत आहेत,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांच्या मागणीनुसार ५० क्विंटलची अट काढून उन्हाळी धानाला सुद्धा बोनस जाहीर करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२२-०५-२०१७) :** (१) होय.

राज्य शासनाने किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत खरीप हंगाम २०१६-१७ मध्ये खरेदी केलेल्या धानासाठी ५० क्विंटलपर्यंत रु.२०० प्रतिक्विंटल प्रोत्साहन राशी मंजूर केली आहे. २०० रु. प्रति क्विंटल ही राशी बोनस नसून प्रोत्साहनपर राशी आहे व ती दि. ३१ मार्च, २०१७ रोजीपर्यंत म्हणजे खरीप हंगामापुरतीच मर्यादीत आहे.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाड्यात पाणी पुरवठा करणारी वॉटर ग्रीड योजनेबाबत समिती गठित करण्याबाबत**

**(३३) ७५३५७ (२०-०४-२०१७). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यात पाणी पुरवठा करणारी वॉटर ग्रीड योजना राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचा पुर्व व्यवहार्यता अहवाल तयार करण्यासाठी मा.पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त समिती गठीत करण्याची कार्यवाही पुर्ण झाली आहे काय व सदर समिती किती कालावधीत याबाबतचा अहवाल शासनास सादर करणार आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०१-०६-२०१७) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

सदर योजनेचा पूर्व व्यवहार्यता अहवाल तयार करण्यासाठी शासन निर्णय दिनांक ६ डिसेंबर, २०१६ अन्वये मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. समितीचा पुर्व व्यवहार्यता अहवाल सादर करण्याचा कालावधी निश्चित केलेला नाही. मात्र, सदर समितीव्दारे योजनेचा पुर्व व्यवहार्यता अहवाल तयार करण्याची कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भ‍ावत नाही.

---

**राज्यात डाळींचे दर नियंत्रित ठेवण्यासाठी दर नियंत्रक कायद्याच्या प्रारूपास मंत्रिमंडळाने मान्यता देण्याबाबत**

**(३४) ७६१६९ (२०-०४-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.राजन साळवी (राजापूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात डाळींचे दर नियंत्रित ठेवण्यासाठी दर नियंत्रक कायद्याच्या प्रारुपास मा. राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कायद्याच्या प्रारुपास केंद्र शासनाची मान्यता प्राप्त करून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२४-०५-२०१७) :** (१) होय
(२) राज्य शासनाने डाळींसाठी दर नियंत्रक कायद्याचे प्रारुप तयार केले आहे. सदर प्रारुपात केंद्र शासन तसेच विधी व न्याय विभागाच्या सूचनेस अनुसरुन सुधारणा करण्यात आली आहे. तद्नंतर सुधारीत कायद्याचे प्रारुप दिनांक ०१.१२.२०१६ च्या पत्रान्वये केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहे. तसेच दिनांक ११.०४.२०१७ च्या पत्रान्वये या प्रस्तावाच्या सद्यस्थितीबाबत विचारणा करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‍भ‍ावत नाही.

---

**सातारा जिल्हयातील गॅस एजन्सी ग्राहकांकडून सिलिंडरच्या किंमतीपेक्षा जादा पैसे घेऊन फसवणूक करीत असल्याबाबत**

**(३५) ७६७३९ (२०-०४-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्हयातील गॅस एजन्सी ग्राहकांकडून सिलिंडरच्या किंमतीपेक्षा वाहतूक खर्चाच्या नावाखाली जादा पैसे घेत असून ग्राहकांची फसवणूक करीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी गॅस ग्राहकांनी अन्न व नागरी पुरवठा विभाग व संबंधित विभागांकडे तक्रार करुनही कोणतीच कारवाई होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व संबधित गॅस एजन्सीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२३-०५-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण २०१५/प्र.क्र.२०९/नापु-२४, दि. १६ मार्च, २०१६ अन्वये सीमाक्षेत्रा बाहेरील ग्राहकांना गॅस सिलिंडर घरपोच पुरविण्यासाठी वाहतुकीचे दर निश्चित करण्याबाबत संबंधित क्षेत्रातील तेल कंपन्यांनी विचारविमर्श करुन निर्णय घेण्याबाबत संबंधित जिल्हयांच्या जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार प्रदान करण्यात आले असून, त्यानुसार जिल्हाधिकारी, सातारा यांनी त्यांचे आदेश पत्र क्र.पुशा/रॉकेल/३३३/१६, दि.१६/०५/२०१६ अन्वये गॅस वितरकांकडून गॅस सिलेंडर वाहतूकीचे दर ठरवून दिलेले आहेत. त्याअनुषंगाने कार्यवाही चालू आहे.

---

**बीड जिल्ह्यातील शिरूर व आष्टी तालुक्यातील गावांना जायकवाडी धरणातून प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेबाबत**

**(३६) ७९२४७ (२०-०४-२०१७). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील शिरूर व आष्टी तालुक्यातील गावांना जायकवाडी धरणातून प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या कार्यान्वणासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बीड यांचेकडून योजनेचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करण्याचे काम सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेच्या पुर्ततेसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०१-०६-२०१७) :** (१) केवळ बीड जिल्हयातील शिरुर व आष्टी तालुक्यासाठी नसुन, संपुर्ण मराठवाडा विभागासाठी वॉटर ग्रीड पध्दतीने पाणी पुरवठा करण्यासाठी व्यवहार्यता तपासण्यात येत आहे.
(२) व्यवहार्यता अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदर योजनेबाबत निर्णय होईल.
(३) प्रश्न उद्‌भ‌ावत नाही.

---

**मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील १८९ पाणीपुरवठा योजनांपैकी २७ ग्रामपंचायतीच्या स्थानिक समितीने पाणी पुरवठा योजनांमध्ये केलेला अपहार**

**(३७) ८०१२३ (२०-०४-२०१७). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील १८९ पाणीपुरवठा योजनांपैकी २७ ग्रामपंचायतीच्या स्थानिक समितीने पाणीपुरवठा योजनांमध्ये कोटयवधीचा अपहार केल्याबाबतचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आल्याचे दिनांक २६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तालुक्यातील १८९ पाणीपुरवठा योजनांचे काम हाती घेऊन ते पारदर्शकरित्या होण्यासाठी स्थानिक ग्रांमपंचायत व गावातील पाणीपुरवठा समिती स्थापन करण्यात आली होती व उक्त योजनांची जबाबदारी या समित्यांवर सोपविली होती, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच याबाबत अनेक कंत्राटदारांनी पाणीपुरवठा योजना कार्यान्वित न करता करोडो रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत ठाणे जि.प. ने पाणीपुरवठा योजनांचे सन २०१२ ते २०१६ या कालावधीत केलेल्या लेखापरिक्षण अहवालात निदर्शनात आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त सर्व प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०३-०६-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
मुरबाड तालुक्यातील १८७ पाणी पुरवठा योजनांपैकी २७ पाणी पुरवठा योजनांमध्ये आर्थिक अपहार निदर्शनास आल्याने संबंधित ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष व सदस्य यांच्यावर जिल्हा परिषदेमार्फत फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले असून सदर गुन्हयांचा तपास अर्थिक गुन्हे शाखेमार्फत करण्यात येत आहे.

(२) होय, हे खरे आहे.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणीची संपूर्ण जबाबदारी संबंधित ग्रामपंचायत व ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची आहे.

(३) नाही, हे खरे नाही.

ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या बँक खात्यामध्ये अदा करण्यात आलेला शासन निधी योजनेच्या कामावर खर्च न करता अपहार करण्यात आल्याचे निदर्शनास आल्याने जिल्हा परिषदेमार्फत सन २०११ ते २०१५ दरम्यान टप्प्या-टप्प्याने ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या पदाधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(४) ठाणे जिल्ह्यात सन २००५-०६ पासून घेण्यात आलेल्या ६२२ पाणी पुरवठा योजनांची चौकशी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्यामार्फत करण्यात आली आहे. चौकशीच्या अनुषंगाने गुन्हे दाखल करण्यात आले असून संबंधित पोलीस यंत्रणेमार्फत पुढील तपास सुरु आहे. अपहारीत रक्कम वसुल करण्याच्या अनुषंगाने गुन्हे दाखल करण्यात आलेल्या एकूण २८ योजनांपैकी ४ योजनांतील अपहारीत रकमेचा भरणा करण्यात आला असून २२ योजनांतील समितीच्या पदाधिकाऱ्यांच्या ७/१२ वर बोजा चढविण्याचा प्रस्ताव जिल्हा परिषदेमार्फत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगाव जिल्ह्यात २१ पैकी फक्त चारच धान्य खरेदी केंद्र सुरु असल्याबाबत**

**(३८) ८०१२९ (२१-०४-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यात २१ पैकी फक्त चारच धान्य खरेदी केंद्र सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केवळ चारच धान्य खरेदी केंद्र सुरु असण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच सदरची धान्य केंद्र काळी ज्वारी खरेदी करीत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. गिरीश बापट (२२-०५-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) जळगाव जिल्हयात २१ स्वस्त धान्य खरेदी केंद्रापैकी ४ केंद्रावर धान्याची आवक झाल्याने उर्वरित केंद्रे बंद करण्यात आली होती. शासनाचे FAQ दर्जाची ज्वारी खरेदी करण्याचे निर्देश आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील धनेगांव, वाजेगाव, बळीरामपूर व तुप्पा या गावांचा पुरवठा सुरळीत करण्याबाबत**

**(३९) ८०७०७ (२०-०४-२०१७). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील धनेगांव, वाजेगाव, बळीरामपूर व तुप्पा या ग्रामपंचायत गावांचा पाणी पुरवठा सुरळीत न झाल्यास जलसमाधी घेण्यात येईल असा इशारा चार गावातील नागरिकांनी संबधित अधिका-यांना माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त गावांना पाणी पुरवठा सुरळीत करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०१-०६-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) होय, सदर योजनेतून चार गावांना दिनांक ३१.१२.२०१६ ते दिनांक १०.१.२०१७ या कालावधीत थकीत विजदेयकाअभावी विज वितरण कंपनीकडून विजपुरवठा खंडीत केल्यामुळे होणारा पाणी पुरवठा बंद होता. चार गांवाच्या ग्रामपंचायतींनी दिनांक ११.१.२०१७ रोजी विज देयकाचा भरणा केल्यानंतर पाणी पुरवठा सुरळीत चालू करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**मुंबई येथील वाशीतील घाऊक अन्नधान्य बाजारात सध्या दररोज चार हजार क्विंटलच्या दरात तुरदाळीचे दर प्रतिकिलो ६० रुपये झाले असल्याबाबत**

**(४०) ८०९६६ (२४-०५-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशी (नवी मुंबई) येथील घाऊक अन्नधान्य बाजारात सध्या दररोज चार हजार क्विंटलच्या दरात तुरडाळीचे दर प्रतिकिलो ६० रुपये झाले असल्याचे माहे डिसेंबर २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुगडाळ ६५ ते ८० रुपये, उडीद डाळ ८० ते १०० रुपये व चनाडाळीचे दर अद्यापही १२० ते १३० रुपये किलोच आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तुरडाळीचे भाव नियंत्रणात ठेवण्यासोबतच मूगडाळ उडीदडाळ तसेच चनाडाळीचे भाव सर्वसामान्यांना परवडतील अशा दरात उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२३-०५-२०१७) :** (१) होय
(२) कृषि उत्पन्न बाजार समिती वाशी यांच्या अहवालानुसार माहे डिसेंबर, २०१६ मध्ये महिना अखेरीस मुगडाळ प्रति किलो दर रुपये ५८ ते ६४, उडीदडाळ प्रति किलो दर रुपये ७६ ते ९४ व चनाडाळ प्रति किलो दर रुपये ११८ ते १२५ इतका होता.
(३) राज्यात डाळींचे दर नियंत्रित ठेवण्यासाठी, डाळींसाठी दर नियंत्रक कायद्याचा मसुदा मंत्रीमंडळाच्या मान्यतेनंतर केंद्र शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला आहे.

शासनाने दि.२८.१२.२०१५ च्या शासन निर्णयान्वये अ.मु.स. (कृषि) यांच्या अध्यक्षतेखाली दर नियंत्रण समिती गठीत केली असून, डाळींच्या दराबाबत वेळोवेळी बैठका घेऊन आढावा घेण्यात येत आहे.

राज्यात डाळींचे दर नियंत्रित ठेवण्याच्या दृष्टीकोनातून सर्व जिल्हाधिकारी यांनी त्यांचे स्तरावर त्यांच्या जिल्हयातील सर्व संबंधित किरकोळ व घाऊक व्यापारी तसेच आयातदार यांच्या नियमितपणे बैठका घेऊन आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत तसेच जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत साठा निर्बंधांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत शासनाच्या दि.१६.०४.२०१६, दि.२०.०६.२०१६, दि.२३.०९.२०१६ व दि.३०.०९.२०१६ च्या पत्रान्वये तसेच दि.०१.०७.२०१६ चे अ.शा.पत्रान्वये सर्व क्षेत्रिय कार्यालयांना सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्हयातील प्रादेशिक योजनेतील कंत्राटी कामगारांना वेतन मिळण्याबाबत**

**(४१) ८१००२ (२०-०४-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्हयातील ४५ गावांना पाणी पुरवठा करणाऱ्या कवठेमहांकाळ-विसापूर योजना, मणेराजुरी प्रादेशिक योजना व येळावी प्रादेशिक योजनेवर सुमारे १०० कामगार कंत्राटी पद्धतीने अल्प वेतनावर काम करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कंत्राटी पद्धतीने काम करणारे कामगार गत सहा महिन्यापासून वेतनापासून वंचीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने उक्त कामगारांना तात्काळ वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०८-०५-२०१७) :** (१) हे खरे नाही.

सदर योजनेच्या दैनंदिन संचलन देखभाल दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदेमार्फत ई-निविदेद्वारे निश्चित केलेल्या मक्तेदारांनी योजनेवर एकूण ८० कंत्राटी कर्मचारी नेमले असून, कर्मचाऱ्यांना मक्तेदारांकडून वेतन अदा केले जाते.

(२) होय, हे खरे आहे.

सदर तिनही प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांच्या स्विकृत निविदेनुसार नेमेलेल्या मक्तेदारांची देयके माहे जुलै २०१६ पासून प्रलंबित आहेत.

(३) शासनाकडून कमी प्रमाणात प्राप्त झालेले अनुदान, पाणी पट्टी वसूली व योजनांच्या दैनंदिन संचालनाचा खर्च या मधील तफावतीमुळे मक्तेदारांची देयके अदा करणे शक्य झालेले नाही.

जिल्हा परिषद सांगली मार्फत प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना संचलनासाठी येणारा खर्च व पाणीपट्टी वसुली यामधील तफावत कमी करण्यासाठी पाणीपट्टी मध्ये वाढ व नळजोडणी संख्येमध्ये वाढ प्रस्तावित करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे कर्मचाऱ्यांचे वेतन व योजना संचलन करणाऱ्या मक्तेदारांची देयके नियमित अदा करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या वार्षिक अंदाजपत्रकामध्ये विशेष तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भ‍ावत नाही.

---

**डोंगरगाव (ता.समुद्रपूर, जि.वर्धा) येथे घरगुती गॅस सिलेंडरचा स्फोट झाल्याने बाधित कुटुंबाला कंपनीने नुकसान भरपाई दिली नसल्याबाबत**

**(४२) ८१४४६ (२०-०४-२०१७). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंगरगाव (ता.समुद्रपुर, जि.वर्धा) या गावातील श्री.विलास गोटेफोडे यांच्या घरगुती वापरातील इंडीयन कंपनीचा निकृष्ट दर्जाचा गॅस सिलेंडरचा स्फोट झाल्याने त्यांचे आर्थिक नुकसान व कुटुंबियांना गंभीर जखमी होऊनही कंपनी व्यवस्थापनाने १ वर्षे उलटून सुध्दा अद्‌याप कोणतीच नुकसान भरपाई दिलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त बाधित कुटुंबाला नुकसान भरपाई त्वरित मिळण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे तसेच कार्यवाहीची सद्‌यस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२३-०५-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) डोंगरगांव (ता.समुद्रपूर, जि.वर्घा) येथे घरगुती गॅस सिलेंडरचा स्फोट झाल्याने श्री.विलास गणपतराव गोटेफोडे यांना दि.३०/०३/२०१५ रोजी झालेल्या सिलेंडर स्फोटचा इन्शुरंस वेळेत मिळण्याबाबत जिल्हा पुरवठा अधिकारी, वर्धा कार्यालयाचे दि.१९/१२/२०१६ च्या पत्रान्वये वैष्णवी गॅस एजन्सी, समुद्रपुर यांना पत्र देण्यात आले असून सदर एजन्सीकडून दि.३०/०३/२०१५ अन्वये शाखा प्रबंधक, दि.न्यु.इंडिया इन्सुरंस कंपनी लिमिटेड तसेच विभागीय व्यवस्थापक इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.,नागपूर यांना बाधित कुटुंबाला आर्थिक नुकसान भरपाई देण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतु अदयाप आर्थिक नुकसान भरपाई दिलेली

नसल्याने दि.२३/०१/२०१७ च्या पत्रान्वये विभागीय व्यवस्थापक इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. नागपूर यांना कळविण्यात आलेले आहे. तसेच जिल्हा पुरवठा अधिकारी, वर्धा व इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. कडून बाधित कुटुंबाला आर्थिक नुकसान भरपाई मिळण्याबाबत दि.न्यु.इंडिया इन्सुरंस कंपनीकडे सतत पाठपुरावा सुरु आहे.

---

**पुणे विभागात रॉकेल तसेच धान्याचा कोटा कमी करण्यात आल्याबाबत**

**(४३) ८१५१० (२०-०४-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयात शिधापत्रिका आधारकार्ड जोडण्याची मोहिम राज्य शासनाने सुरु केल्यानंतर पुणे विभागात मागील वर्षी सुमारे २ हजार ३०३० लिटर्सचा (२३ लाख ३ हजार लिटर्स) रॉकेलचा कोटा कमी करण्यात आला तसेच धान्याची मागणीसुध्दा सुमारे ६ हजार ७०७ टनानी घटली असल्यामुळे गरीब व सर्वसाधारण नागरिकांना रॉकेल व धान्य शिधापत्रिकेवर मिळत नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रॉकेलचा व धान्याचा कमी करण्यात आलेला कोटा पूर्ववत वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२३-०५-२०१७) :** (१) व (२) सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत गॅसजोडणीधारक शिधापत्रिकाधारकांना केरोसिन अनुज्ञेय नाही. गॅस जोडण्यांच्या संख्येत वाढ होत आहे. तसेच पात्र शिधापत्रिकाधारकांना केरोसिन व धान्य मिळण्यासाठी दि.१३ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये आधार क्रमांक सादर करणे अनिवार्य करण्यात आलेले आहे. ज्या शिधापत्रिकाधारकांकडे आधारकार्ड नाहीत त्यांचा धान्य व केरोसिनचा कोटा आधारकार्ड सादर करेपर्यंत स्थगित ठेवण्यात येत आहे. आधारकार्ड सादर न केल्यामुळे परिणामी केरोसिन व धान्याची मागणी कमी झाली आहे.

आधार क्रमांक सादर करणाऱ्या शिधापत्रिकाधारकांना विहित परिमाणानुसार केरोसिन व इष्टांकानुसार धान्य वितरित करण्यात येत आहे. यास्तव शिधापत्रिकाधारकांना केरोसिन व धान्य मिळत नसल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) प्रश्न उद्‌भ‌‌वत नाही.

---

**मालेगांव (जि.नाशिक) तालुक्यातील शासकिय गोदामाच्या सुरक्षिततेबाबत**

**(४४) ८१६६७ (२०-०४-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) तालुक्यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागा तर्फे ८४ लाख रुपये खर्च करुन उभारण्यात आलेले शासकिय गोदाम ताब्यात न घेताच त्यात अन्नसुरक्षा योजनेचे ६००० क्विंटल धान्य साठविण्यात आले असून उक्त गोदामात विदयुत पुरवठा व सुरक्षा रक्षक नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त गोदाम ताब्यात घेऊन त्यातील धान्याच्या सुरक्षेकरिता व विद्युत पुरवठा करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व याबाबत शासनाची स्पष्ट भूमिका काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२९-०५-२०१७) :** (१) व (२) नाशिक जिल्हयातील मालेगाव तालुक्यात एकूण २००० मे.टन क्षमतेची चार गोदामे आहेत. सदर गोदांमांपैकी महानगर पालिका हद्दीतील भागासाठी ५०० मे.टन क्षमतेचे एक शासकीय धान्य गोदाम व ५०० मे.टन क्षमतेचे एक खाजगी गोदाम अशी २ गोदामे आहेत.तसेच ग्रामीण भागासाठी ५०० मे.टन क्षमतेचे एक शासकीय धान्य गोदाम व ५०० मे.टन क्षमतेचे एक खाजगी गोदाम अशी २ गोदामे आहेत. सदर गोदामे अनुक्रमे धान्य वितरण अधिकारी, मालेगाव व तहसिलदार, मालेगाव यांच्या ताब्यात आहेत. सदर गोदामांमध्ये काम करण्यासाठी पुरेसे कर्मचारी कार्यरत असून सदर गोदामांमध्ये विद्युत पुरवठा सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भ्‍ावत नाही.

---

**अक्कलकोट (जि.सोलापूर) तालुक्यातील नागरीकांनी रेशनकार्डास आधार कार्ड लिंक केले नसल्याने धान्य व रॉकेल देणे बंद केल्याबाबत**

**(४५) ८२६९९ (२०-०४-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्वस्त धान्य वितरणांत पारदर्शकता आणण्यासाठी शासनाने आधार लिंकिंग सक्तीचे केले असून दिनांक ३० नोव्हेंबर, २०१६ पर्यंत आधार न जोडणा-यांना रॉकेलचे वाटप बंद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अक्कलकोट (जि.सोलापूर) तालुक्यातील नागरीकांनी शिधापत्रिकेस आधार कार्ड लिंक केले नाही अशा नागरिकांना धान्य व रॉकेल देणे बंद केल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त नागरिकांना धान्य व रॉकेल मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०१-०६-२०१७) :** (१) राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत लाभार्थ्यांसाठी आधार सिडींग करणे अनिवार्य करण्यात आले आहे. तसेच सदर योजनेकरिता लाभार्थी निश्चित करताना दि.३०.९.२०१६ नंतरच्या शिधापत्रिकांचा विचार करण्यात येऊ नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

अनुदानित केरोसिनचा लाभ घेण्याकरिता दि.१.११.२०१६ पर्यंत आधार क्रमांक सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. आधार क्रमांक सादर न करणाऱ्या शिधापत्रिकाधारकांचा केरोसिन कोटा दि.३१.१.२०१७ पर्यंत रोखून ठेवण्यात आला आहे. दि.३१.१.२०१७ पर्यंत आधार क्रमांक सादर केल्यास रोखून ठेवलेला कोटा वितरित करण्यात आला आहे. दि.१.२.२०१७ नंतर आधार क्रमांक सादर करणाऱ्या लाभार्थ्यांना केरोसिन मिळण्यास पात्र ठरविण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

अशा स्वरुपाची कोणतीही तक्रार अक्कलकोट तालुक्यात प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अंबरनाथ (जि.ठाणे) येथे शिधावाटप कार्यालयासाठी शासकीय जागा उपलब्ध करुन निधीची तरदूत करण्याबाबतची मागणी**

**(४६) ८२९४४ (२०-०४-२०१७). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) शहराची लोकसंख्या ३.२५ लाखांपेक्षा जास्त असतांनाही शहरात एकच शिधावाटप कार्यालय असून ते केवळ १०० चौ.फूटाचे असल्याने फाईल्स, नस्त्या, कागदपत्रे ठेवण्यास विविध अडचणी निर्माण होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरिकांसाठी फक्त दोनच खिडक्या असल्याने नागरिकांच्या कल्याण-बदलापूर रोडपर्यंत रांगा लागत असून सदर रस्त्यावरील भरधाव वाहनाने अनेक अपघात होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिधावाटप कार्यालयासाठी शासकीय जागा उपलब्ध करुन निधीची तरतूद करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ०३ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या पत्राव्दारे मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (३०-०५-२०१७) :** (१) कार्यालयाची जागा एकूण १२०८.६७ चौ.फूट आहे. मात्र अभिलेख ठेवण्यास अडचणी निर्माण झालेल्या आहेत.

(२) नाही.

(३) होय.

(४) भाड्याचे दर प्रमाणित करण्याकरिता प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सादर केला आहे. सुचविलेल्या दुसऱ्या जागेची मोजणी करण्याची विनंती भूमि अभिलेख कार्यालयाला केली आहे.
(५) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

---

**राज्यात तामिळनाडू व राजस्थान सरकारच्या धर्तीवर स्वस्त भोजन योजना सुरु करण्याची मागणी..**

**(४७) ८३५०७ (२०-०४-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात तामिळनाडू व राजस्थान शासनाच्या धर्तीवर स्वस्त भोजन व्यवस्था करण्याची मागणी मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २० फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार राज्यात स्वस्त भोजन व्यवस्था राबविणेबबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२२-०५-२०१७) :** (१) होय.
(२) तामिळनाडू राज्यातील अम्मा किचन, कोझीकोडे (केरळ) येथील ऑपरेशन सुलेमानी, ओरीसा राज्यातील आहार केंद्र योजना व राज्यातील अक्षय पात्र योजना या चारही योजनांच्या आधारे राज्यावर कोणताही आर्थिक भार येणार नाही अशी योजना सुरु करण्याची शक्यता पडताळून पाहण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

---

**धारणगाव (ता.कोपरगाव, जि.अहमदनगर) येथील पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्याबाबत**

**(४८) ८३७११ (२०-०४-२०१७). श्रीमती स्नेहलता कोल्हे (कोपरगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धारणगाव (ता.कोपरगाव, जि.अहमदनगर) येथील पाणीपुरवठा योजनेचे काम अनेक दिवसांपासून अपूर्ण अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेचा पुनर्सुधारित प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त योजना पूर्ण करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०१-०६-२०१७) :** (१) होय.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### दिग्रस (जि.यवतमाळ) येथील स्वस्त धान्य दुकानदारांच्या मनमानी कारभाराबाबत

**(४९) ८४०८८ (२०-०४-२०१७). अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिग्रस (जि.यवतमाळ) येथील स्वस्त धान्य दुकानावर शिधापत्रिकाधारकांना माल कमी देणे, जादा पैसे घेणे, मर्जीतील लोकांना धान्य देणे आदी प्रकार होत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी तहसीलदारांना स्थानिक नागरिकांनी निवेदन देऊनसुध्दा संबंधित दुकानदार मनमानी करत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व संबंधितावंर कोणती कारवाई केली तसेच शिधापत्रिकाधारकांना सुरळीत धान्य पुरवठा करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२३-०५-२०१७) :** (१) हे खरे आहे.दिग्रस तालुक्यातील रास्तभाव धान्य दुकानदारांविरूध्द तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.
(२) व (३) हे खरे नाही.

दिग्रस तालुक्यामध्ये ५ रास्तभाव दुकानदाराविरुध्द प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार, दिग्रस यांनी पुरवठा निरिक्षक यांच्यामार्फत तपासणी करुन एका दुकानदाराचा परवाना रद्द करण्यात आला, एका दुकानदाराचा परवाना निलंबित करण्यात आला आहे. दोन दुकानदारांना ताकीद देवून त्यांची अनुक्रमे १००% व ५०% अनामत रक्कम जप्त करण्यात आली आहे. एका प्रकरणी तक्रार अर्जात तथ्य नसल्याने तसेच एका नागरीकाने सर्व रास्तभाव दुकानदारांच्या विरुध्दच्या प्राप्त तक्रारीत तथ्य आढळून न आल्यामुळे तक्रार अर्ज निकाली काढण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ईस्लापूर (ता.किनवट, जि.नांदेड) येथील स्वस्त धान्य दुकानातील धान्याचा होत असलेला काळाबाजार

**(५०) ८४५२८ (२०-०४-२०१७). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

वि.स. २९३ (37)

(१) ईस्लापूर (ता.किनवट, जि.नांदेड) परिसरातील स्वस्त धान्य दुकानातील धान्य अवैधरित्या साठवून धान्य स्थानिक अधिका-यांच्या संगनमताने काळयाबाजारात विक्री होत असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (३१-०५-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भ‌ावत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.